# इ-Commerce व्यवसायाचा मूलाधार: त्याच्या कल्पनेची वैधता

## कल्पनेची वैधता म्हणजे काय नक्की?

आपल्या डोक्यात असंख्य कल्पना येत असतात, क्षणोक्षणी. मनच ते. मनाला मर्कटा (माकडा) प्रमाणे संबोधले गेले आहे. त्याचा गुणधर्मच आहे तो. म्हणजे माकड कसं एका फांदीवर बसेल तिथलं एखादं फळ चाखून पाहील, वाटलं तर पूर्ण खाईल किंवा तस्सच फेकून देईल; लगेच उडी एकदम दुसऱ्याच फांदीवर किंवा चक्क दुसऱ्याच झाडावर देखील... जे पूर्णपणे वेगळंच झाड असेल. आपल्या मनाचा प्रवासही असाच असतो. एक विषय, लगेच क्षणार्धात त्यालाच जोडून दुसराच विषय, त्याला जोडून तिसराच विषय, वगैरे वगैरे. हे काही “वाईट” किंवा “चांगलं” असं काहीच नाही. फक्त ही मनाची स्वाभाविक सवय आपण काही ठिकाणी खुबीने वापरायची म्हणजेच त्या मर्कटाला काही बागांमध्ये मुक्तपणे उधळू द्यायचं, तर काही ठिकाणी लगाम घालायचा. हे का बरं? तर आपल्याला एक यशस्वी असा इ-कॉमर्स व्यवसाय उभा करायचाय, म्हणून! यशस्वी म्हटला, कि दोन प्रमुख निकष आले:

१. तो जी गरज किंवा पोकळी भरण्यासाठी उभारायचाय, तो ग्राहकवर्ग समाधानी व्हायला हवा.
२. ग्राहक समाधानी झाल्यावर उद्योजक अर्थात प्रवर्तकसुद्धा समाधानी व्हावा - म्हणजेच व्यवसायात व्यवस्थित नफाही व्हावा.

हे असं, व्यवसायाला सुरुवात करायच्या आधीच ठरवणे, म्हणजेच कल्पनेची वैधता (Validation) ठरवणे.

## कल्पना वैध ठरवण्याची पद्धत:

ही एखाद्या महाविद्यालयात शिकविली जाणारी पद्धत नाहीये बरं. असली आणि सापडलीच तर केवळ योगायोग समजा. कारण ही पद्धत मी माझा पहिला online व्यवसाय; ज्याला **'इ-कॉमर्स'** व्यवसाय असं म्हणता येईल - तो उभा करताना वापरली. तत्पूर्वी ह्या कल्पना वैधतेच्या प्रक्रीयेकरीता काही पूर्व तयारी आवश्यक आहे. ती अशी:

### १. ठराविक वेळ-रोजच्या रोज राखून ठेवा.

जी इच्छा तुम्ही मनात धरली आहे, अथवा जे स्वप्न तुम्ही पाहताय (म्हणजे माझा इ-कॉमर्स व्यवसाय यशस्वीरीत्या उभा राहिला, तर माझा काय थाट असेल वगैरे), ती इच्छा अथवा स्वप्न प्रत्यक्षात आणण्यासाठी प्रत्यक्ष तुम्हाला काम करावे लागेल, अर्थात त्याकरिता “वेळ” द्यावा लागेल. रोजच्या रोज किंवा दिवसा-आड तरी. मुद्दा असा आहे, कि हा वेळ नियमित द्यावा लागेल आणि हे सातत्य पाळावेही लागेल.

हाच वेळ आपण कल्पना वैध करणे, इ-कॉमर्स मधील विविध अंगे शिकणे इत्यादीसाठी निरंतर वापरणार आहोत. हा वेळ, तुमच्या इतर कामांपेक्षा पूर्णपणे अलिप्त, वेगळा असेल. ह्या वेळात इतर गोष्टींचे आक्रमण नको.

आता किती वेळ द्यावा? पुन्हा ह्याला काही नियम नाहीये; पण साधारण एखादा तास पुरेसा होईल. शिवाय, हा वेळ तुम्ही तुमचं इतर रुटीन, तुमची सध्या चालू असलेली नोकरी अथवा व्यवसाय चालू ठेवत काढणार आहात, निदान अपेक्षित तरी तसंच आहे.

## २. ठिकाण ठरवा.

हे व्यवसायाचे ठिकाण मी म्हणत नाहीये, तर विचार करण्याचे ठिकाण म्हणतोय. एकांतात तुम्हाला कोणी डिस्टर्ब करणार नाही अशा ठिकाणी व अशा वेळी जा. उदा.: मी सतत टेकडीवर संध्याकाळी गेलेलो आहे. अर्थात हा काही नियम नाही. प्रत्येकाचा **"Creative"** अर्थात कल्पक वेळ वेगवेगळा असू शकतो. एखाद्याचा रात्री असेल, एखाद्याच पहाटे. एखाद्याला सुंदरशा बागेत एकाग्र वाटेल, तर एखाद्याला छानशा उपहारागृहातही मस्त वाटेल. जिथे तुम्हाला मोकळं - मनाने वाटेल, आणि तुमचे तुम्हीच असाल, अशीच जागा निवडा.

## ३. एक वही करा.

एक वेगळी वहीच करा. तीच वही ५ विषयांची असल्यास उत्तम. अशा विविध प्रकारच्या वह्या मिळतात. पुण्यात Venus Traders नावाचे एक उत्तम दुकान आहे, इथे ह्या मिळतात; पण तुम्हाला आवडेल अशी कोणतीही वही चालून जाईल. मल्टी-सब्जेक्ट नाही मिळाली, तर एकाच वहीत अनेक भागही करता येतातच की! बस मग. ही वही तर कराच, शिवाय एक खिशात मावणारी छोटी वही, व सोबत पेन्सिल तसेच रबर सुधा असू द्या. ही छोटी वही शक्यतो स्वत:बरोबर कायम ठेवा. कल्पना काही सांगून येत नाहीत, आणि त्या कुठेही येतात (*तुम्हाला कळलंच असेल मी काय म्हणतोय ते*). फक्त तेव्हा आपल्याकडे ती नोंदवायला साहित्य हवं. मोबाईल चालणार नाही का? तर चालेल, पण पुन्हा तो उघडला की तुम्ही त्यातलं whatsapp तपासणार, फेसबुक बघणार, पुन्हा अनेकाग्रतेला निमंत्रण. म्हणून वही-पेन्सिल.

## ४. वहीतला भाग १:

पहिल्या भागाला नाव द्या : "मी हे का करत आहे?"

विचित्र वाटतंय? वाटेल एखादे वेळेस. पण स्वत:ला हे ठाऊक असणं अत्यंत आवश्यक आहे. का बरं मला चालू करायचाय इ-कॉमर्स व्यवसाय? त्यातलं काय मला आवडतं? आपोआप खात्यात पैसे पडणं, की ते छान सोफ्टवेअर? की सगळ्यांना दारात वस्तू पोचवणे? फार विचार करण्याची गरज नाही. तुम्हाला सर्वात आधी त्यातलं काय भावलं ते आठवा.

प्रथम काही दिवस (साधारण १ आठवडा) ह्यावर विचार करून विविध कारणं - उत्तरं मांडा. वेळ लागेल, लागू देत. पण हाच तुमच्या सबंध उर्वरित आयुष्याचा आधार असू शकेल. जितकं लिहिता येईल तेवढ लिहा, फक्त एका आठवड्यात (पहिल्या टप्प्यात) संपवा. तसेच रोजही एखाद्या तासाच्या वर ह्याला वेळ नका देऊ. इतर सर्व व्यवधानं बंद करून तर नकोच. फक्त ह्या ठराविक वेळातच तुमचे तुम्ही रहा. शक्यतो फोनची रेंज नसेल अशा ठिकाणी.

पुढे काय करायचं, ते विचक्षणच्या पुढील लेखात पाहूयात.

- सौमित्र घोटीकर,

**Online Marketing** चे सल्लागार,

Joy Web Services Pvt. Ltd. पुणे चे संचालक

**या विषयाशी निगडीत असलेले अजून लेख वाचायचे असल्यास अथवा download करायचे असल्यास या link वर click करणे ===> http://joywebservices.com/vichakshan/**